विषय - श्री.पी.एन.पाचनकर, कनिष्ठ अभियंता, जि.प.सा.बां.उपविभाग श्रीगोंदा, ता.श्रीगोंदा यांच्याविरुध्द प्राप्त झालेल्या लोकसभा आचारसंहिता निवडणूक २०२४ चा भंग केलेने शिक्षा अंतिम करणेबाबत.

संदर्भ – १. जिल्हा नोडल अधिकारी, आचारसंहिता कक्ष, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ तथा अप्पर जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडील पत्र क्रं.लोकसभा-२४/आचारसंहिता कक्ष/एस.आर./१७/२०२४ अहमदनगर दिनांक ११/०५/२०२४

२. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांचेकडील कारणे दाखवा नोटिस क्रं.बांध/कार्या-१/आरथा-१/३४०/२०२४ दि.१३/०५/२०२४

३. श्री.पी.एन.पाचनकर, कनिष्ठ अभियंता, जि.प.सा.बां.उपविभाग श्रीगोंदा यांचा दि.१५/०५/२०२४ रोजीची नोटिस प्राप्त झालेची पोहोच

४. उप अभियंता, जि.प.सा.बां.उपविभाग श्रीगोंदा यांचेकडील पत्र क्रं.वशि/आरथा/१७५/२०२४ दि.१६/०५/२०२४ अन्वये श्री.पी.एन.पाचनकर, कनिष्ठ अभियंता खुलासा प्राप्त (कार्यासनास प्राप्त दि.१७/०५/२०२४)

५. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४

जा.क्रं.बांध/कार्या-१/आरथा-१/३८७/२०२४
सार्वजनिक बांधकाम दक्षिण विभाग

अहमदनगर दि. २८/०५/२०२४
जिल्हा परिषद अहमदनगर

## आदेश

तुम्ही राजकीय पक्षाचे स्टेटस तुमचे वैयक्तिक मोबाईलवर ठेवलेबाबतचा पुरावा प्राप्त झालेने तुम्हाला संदर्भ क्रं.२ अन्वये कारणे दाखवा नोटिस बजाविणेत आली असता तुमची सदर नोटिस मिळालेची पोहोच संदर्भ क्रं.३ अन्वये या कार्यालयास प्राप्त झालेली आहे. सदर कारणे दाखवा नोटिसचा खुलासा सादर करणेसाठी तुम्हास २(दोन) दिवसांची मुदत देणेत आलेली होती. संदर्भ क्रं.४ अन्वये तुमचा खुलासा प्राप्त झाला असुन सदर खुलाश्यामध्ये तुम्ही सदर मोबाईल तुमचा वैयक्तिक असल्याचे मान्य केले आहे. सबब तुम्ही आचारसंहिता भंग केलेचे सिध्द होत आहे. तुम्ही महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ३ व ४ चा भंग केलेला आहे.

सबब मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर सदर प्रकरणी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा(शिस्त व अपील) नियम १९६४ मधिल नियम ४ ( ) नुसार एक वेतनवाढ कायमस्वरूपी रोखणे ही शिक्षा अंतीम करणेत येत आहे. या आदेशाची नोंद श्री.पी.एन.पाचनकर, कनिष्ठ अभियंता, जि.प.सा.बां.उपविभाग श्रीगोंदा, ता.श्रीगोंदा यांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी.

सदर आदेश जिल्हा परिषद अहमदनगरच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला असून त्याचा संकेतांक २०२४०५२८९२०००९ असा आहे.

(आशिष येरेकर भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति,
श्री.पी.एन.पाचनकर, कनिष्ठ अभियंता, जि.प.सा.बां.उपविभाग श्रीगोंदा, ता.श्रीगोंदा

प्रत - उप अभियंता, जि.प.सा.बां.उपविभाग श्रीगोंदा, ता.श्रीगोंदा
२/- सदर आदेशाची प्रत श्री.पाचनकर यांना बजावून त्यांची दिनांकित पोहच या कार्यालयास सादर करावी.

(आशिष येरेकर भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर



Scanned with OKEN Scanner